| | | |
|---|---|---|
| सादर दिनांक | : | ०१/०१/२०१८ |
| नोंदणी दिनांक | : | ०१/०१/२०१८ |
| निकाल दिनांक | : | २८/०१/२०१९ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०१ ०० २७ |

## २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्त.मलकापूर यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी - एस.डी. हरगुडे)

नियमित दिवाणी दावा क्र.- ०१/२०१८ निशाणी क्रं.

मे. एस.एन. फिरके,
बुलडाणा रोड मलकापूर, जि. बुलडाणा.
तर्फे भागीदार सुरेश सिताराम फिरके,
वय ५० वर्ष, व्यवसाय- व्यापार व शेती,
रा. मलकापूर,ता.मलकापूर, जिल्हा बुलडाणा. वादी

--विरुध्द--

प्रेमसिंह संग्रामसिंह राजपूत,
वय ५५ वर्ष, व्यवसाय- शेती,
रा. निंबारी, पो. शिराढोण, ता. मलकापूर,
ता. जिल्हा - बुलडाणा. प्रतिवादी.

---

रक्कम रुपये ३,८६,९१४/- वसुल होवुन मिळणेबाबत.

---

वादीतर्फे विद्वान वकील श्री. आर.व्ही. पाटील,
प्रतिवादी तर्फे दावा एकतर्फी.

---

## न्यायनिर्णय

(उदघोषणा २८ जानेवारी, २०१८)

प्रस्तुत दावा रक्कम रुपये ३,०७,८०७/- वर दि. २७/०७/२०१६ ते ३१/१२/२०१७ पावेतो १८ % द.सा.द.शे. व्याजासहीत एकुण रककम रुपये ३,८६,९१४/- ही प्रतिवादीकडून वसुल होवून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२.. वादी हा मे. एस.एन. फिरके ही इंडीयन पार्टनरशिप ॲक्ट १९३२ अन्वये पंजीकृत भागीदारी संस्था असुन तिचे सुरेश सिताराम फिरके व प्रशांत सिताराम फिरके हे दोघे भागीदार आहेत. ते दोघेही सदरहु भागीदारी फर्मचा व्यवसाय पाहतात. वादीचे रासायणीक खते, बि-बियाणे आणी किटकनाशक औषधे यांचा व्यवसाय असुन प्रतिवादी हा त्याचा खुप जुना खातेदार आहे. प्रतिवादीने वादीच्या दुकानात उधारीचे खाते उघडले असुन दरवर्षी वेळोवेळी बियानांचा रासायणी खते व किटकनाशक औषधे उधारीने खरेदी करीत असे. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये झालेल्या व्यवहाराच्या नोंदी वादीने कायदेशीरपणे नियमीत ठेवलेल्या आहेत. दि. ०१/०४/२०१५ रोजी प्रतिवादीकडून वादीला मागील रक्कम रु. ६४,०६९/- ही घेणे बाकी होती परंतु सन २०१५ चे जुन महिन्याचे सुरवातीला प्रतिवादीने दि. ०२/०६/२०१५ रोजी रक्कम रु. १,००,०००/- वादीकडे जमा करुन दि. ०३/०६/२०१५ पासुन वेळोवेळी उधारीने बियाणे, रासायनिक खते व फवारणी औषधांचा माल खरेदी केलेला आहे. त्याची बिले प्रतिवादीस वादीने वेळोवेळी दिलेली आहे. प्रतिवादी याने उधारीपोटी दिलेल्या रकमा ह्या वादीने त्याच्या खाती जमा दाखवीलेल्या आहे. तसेच प्रतिवादी याने दि. २७/०७/२०१६ रोजी शेवटची जमा केलेली रक्कम वगळता त्याचे खात्याचा हिशोब केला असता त्याच्याकडे एकूण रक्कम ३,०७,८०७/- घेणे बाकी होते. प्रत्यक्षात बाजाराभाव शिरस्त्याप्रमाणे तथा सेल ऑफ गुडस ॲक्टचे तरतुदीनुसार प्रतिवादीने उधारीने खरेदी केलेल्या सदर रक्कमांवर नुकसानी दाखल द.सा.द.शे. किमान १८ % व्याज देण्यासही प्रतिवादी जबाबदार आहे. त्या अनुशंगाने वादीने प्रतिवादीला ऑगष्ट २०१६ पासुन बाकी रकमेची वेळोवेळी मागणी केली असता प्रतिवादीने दिलेली नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादीला

ता. २७/११/२०१७ रोजी रजि. पोष्टाद्वारे नोटीस पाठवून व्याजासह रकमेची मागणी केली असता प्रतिवादीला नोटीस मिळुन देखील सदरची रक्कम दिलेली नाही. त्यामुळे रक्कम रुपये ३,०७,८०७/- वर दि. २७/०७/२०१६ ते ३१/१२/२०१७ पावेतो बाजार सिरस्तेप्रमाणे १८ % व्याजासहीत प्रतिवादी कडुन वसुल होवून मिळण्याकरीता वादीने प्रस्तुत दावा दाखल केला आहे.

३.. तदनंतर प्रतिवादीला दाव्याच्या समन्सची बजावणी होवुन सुध्दा प्रतिवादी दाव्यात हजर झाला नाही. त्यामुळे नि. क्र. १ खाली आदेश पारीत करुन सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द एकतर्फी चालवीण्यात आला.

४.. या सर्व परिस्थीतीच्या अनुषंगाने खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दयांचे निष्कर्ष त्यांच्यासमोर त्याखालील कारणमिंमासेसह नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे शाबीत करते काय की, प्रतिवादी याने त्यांच्या दुकानातून रासायणीक खते, बि-बियाणाचा एकून ३,०७,८०७/- रुपयाचा माल उधारीवर विकत घेतलेला आहे काय ? | होय .. |
| २. | वादी हे शाबीत करतो काय की प्रतिवादीला वारंवार थकीत रक्कमेची मागणी करुन सुध्दा देण्यास टाळाटाळ केली आहे ? | होय.. |
| ३. | मागीतल्याप्रमाणे वादीने दिलेली रक्कम व त्यावरील व्याज १८% द.सा.द.शे.प्रमाणे मिळण्यास वादी पात्र आहे काय ? | अशःहोय.. |
| ४.. | आदेश व हुकुमनामा काय ? | दावा अंशतः खर्चासह मंजुर करण्यात येतो. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.१ करीता :**

५.. वादीने त्याच्या कथनाच्या पुष्ठार्थ स्वतःचा सरतपासणी प्रतिज्ञालेख निशाणी १६ प्रमाणे दाखल केला. या तोंडी पुराव्या व्यतीरीक्त वादीने खातेउता-याची सत्यप्रत (निशाणी १७ ते १९) प्रमाणे, प्रतिवादीला दिलेली नोटीस (निशाणी २०), नोटीस पाठवील्याची पावती व मिळाल्याची पोच पावती (निशाणी २१ व २२) प्रमाणे, बिलांच्या प्रती (निशाणी २३ ते ९६) प्रमाणे, प्रतिवादीने जमा केलेल्या रकमेच्या पावत्याच्या पडताळणी प्रती (निशाणी ९७ ते ११०) प्रमाणे, प्रतिवादीने माल परत केल्यानंतर दिलेल्या पावत्या (निशाणी १११ ते ११४) प्रमाणे, वादी भागीदार फर्म असल्याबाबतचे प्रमाणपत्र व फर्म पंजीबध्द झाल्याबाबत प्रमाणपत्राची पडताळणी प्रत (निशाणी ११५ ते ११६) प्रमाणे शाबीत केलेले आहे. त्यानंतर वादीने आणखी पुरावे देणे नसल्याबाबत (निशाणी १७) प्रमाणे पुरसिस दिली.

६.. त्याअनुशंगाने दाव्यात उपलब्ध असलेल्या एकमेव पुराव्याचे अवलोकन केले असता वादी याने त्याच्या वादपत्रातील मचकुराची पुनरावृत्ती केलेली आहे. वादी यांनी त्याच्या पुराव्यात कथन केले आहे की, वादी हा इंडीयन पार्टनरसिप ॲक्ट अन्वये पंजीकृत भागीदारी संस्था आहे. त्याअनुशंगाने वादी हे भागीदार फर्म असल्याबाबतचे प्रमाणपत्र व फर्म पंजीकृत झाल्याचे प्रमाणपत्र नि. ११५ व ११६ प्रमाणे दाखल केले आहे. सदर प्रमाणपत्रांचे अवलोकन केले असता वादी ही भागदारी संस्था असल्याबाबतचे स्पष्ट होते. तसेच वादी याने त्याच्या पुराव्यात कथन केले आहे की, प्रतिवादीने वादीकडून वेळोवेळी रासायनिक खते, बि-बियाणे व किटकनाशक औषधी विकत घेतले व त्याकरीता त्याने दि. ०२/०६/२०१५ रोजी रुपये १,००,०००/- जमा केलेली आहे. वादी व प्रतिवादी मध्ये झालेल्या व्यवहाराच्या नोंदी वादीने नियमितपणे व कायदेशीरपणे प्रतिवादीच्या खात्यात टाकलेला आहे. त्याअनुशंगाने प्रतिवादी याने वादीच्या दुकानातुन घेतलेल्या मालाच्या दि. ०३/०६/२०१५ पासुन ते दि. ०४/०७/२०१६ पावेतोच्या पावत्या निशाणी २३ ते ११४ चे दाखल करुन शाबीत करुन

घेतलेल्या आहेत. सदरच्या पावत्यांचे अवलोकन केले असता प्रतिवादीने वादीचे दुकानातुन वेळोवेळी रासायणीक खते व बि-बियाणे उधारीवर घेतल्याचे तसेच त्याकरीता वेळोवेळी काही रकमा सुध्दा जमा केल्याचे दिसुन येते. प्रतिवादी याने जरी वेळोवेळी काही रकमा वादीकडे जमा केल्या असल्या तरी प्रतिवादीकडे रक्कम रुपये ३,०७,८०७/- ही बाकी असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे वादीचा पुरावा त्याच्या कथनाला सुसंगत असल्याबात दिसुन येते.

७.. त्याअनुशंगाने वादी याने दिलेला संगणीकृत खातेऊता-याची पडताळणी प्रत नि. १७ वरुन सुध्दा वादी ने प्रतिवादीला वेळोवेळी रासानिक खते व बि-बियाणे उधारीवर दिल्याचे स्पष्ट होते. तसेच दि. ०१/०७/२०१७ पावेतो प्रतिवादीकडे ३,०७,८०७/- ही रक्कम बाकी असल्याचे दिसुन येते. त्यामुळे थकीत असल्याने सदर रकमेवर बाजार सिरस्ताप्रमाणे १८% व्याज वादीला देण्याकरीता प्रतिवादी जबाबदार आहे. प्रतिवादी हा दाव्यात हजर न झाल्याने वादीचे कथन नाकारण्यासारखी कोणतीही बाब अभलेखावर आलेली नाही. वादीचा पुराव्याला प्रतिवादीने उलटतपास नोंदवीलेला नसल्याने वादीचा पुरावा अबाधीत राहिलेला आहे. त्याअनुशंगाने वादीचा पुरावा स्विकारल्या शिवाय माझेकडे दुसरा कोणताही पर्याय नसल्याने वादी याचा पुरावा ग्राहय धरुन आहे तसा स्विकारणे क्रमप्राप्त ठरते.

८.. तसेच प्रतिवादीला थकीत रकमेची मागणी करण्याकरीता वादीने रजिष्टर पोष्टाने नोटीस पाठवीली असल्याचे कथन केले आहे. वादीने त्याच्या कथनाच्या पृष्ठार्थ प्रतिवादीला दिलेली नोटीस निशाणी २०, नोटीस पाठवील्याची पावती व मिळाल्याची पोच पावती निशाणी २१ व २२ प्रमाणे दाखल केलेल्या आहे. त्याअनुशंगाने दाव्यात दाखल असलेली नोटीस नि. २० चे अवलोकन केले असता वादी याने प्रतिवादींना दि. २७/११/२०१७ रोजी त्याच्या विधीज्ञांनी मार्फत थकीत बीलाच्या रक्कम वसुली करीता नोटीस पाठवील्याचे स्पष्ट होते. सदरची नोटीस ही प्रतिवादी यांना पाठवील्याच्या पावत्या व प्रतिवादीला नोटीस मिळाल्याची पोच पावत्या देखील वादीने निशाणी २१ ते २२ वर दाखल केलेल्या आहे. यावरुन नोटीस मिळुन देखील प्रतिवादीने थकित मालाची रक्कम वादी याला

दिलेली नसल्यामुळे प्रतिवादींनी थकित मालाची रक्कम देण्यास टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते.

९.. वादीने दाखल केलेला पुरावा व दस्तऐवजावरुन प्रतिवादीने वादीकडुन वेळोवेळी बि-बियाणे, किटकनाशके उधारीवर विकत घेतले होते हे सिध्द होते. वादी यांनी प्रतिवादी यांना थकीत रक्कम वारंवार मागणी करुन देखील प्रतिवादीने सदर रकम देण्याचे टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे प्रतिवादी हा रक्कम रुपये ३,०७,८०७/- वर बाजार शिरस्ते १८ % प्रमाणे दि. २७/०७/२०१६ ते ३१/१२/२०१७ पावतो होणारे व्याज रक्कम रुपये ७९,१०७/- अशी एकुन रक्कम रु. ३,८६,९१४/- वादीस अदा करण्यास जबाबदार आहे.

१०.. अधीक सांगायचे झालेतर वादीने दावा दाखल तारखेपासुन रक्कम रुपये ३,८६,९१४/- वर व्याज द.सा.द.शे. १८% प्रमाणे मंजुर होण्याची मागणी केलेली आहे. परंतु वादीची दावा दाखल तारखेपासुन सदर रकमेवर व्याजाची मागणी पाहता दिवाणी प्रकिया संहिता कलम ३४ प्रमाणे दरसाल दर शेकडा जास्तीत जास्त ६ % पेक्षा जास्त दराने अशा मुद्दल रकमेवर अतिरिक्त व्याज आकारणे रास्त होणार नाही. तसेच राष्ट्रीयकृत बॅकेचे व्याजदरच्या अनुसरुन वादी मागणी करतो त्याप्रमाणे मुळ रकमेवर १८ % द.सा.द.शे. व्याजदर आकारणे कदापी न्यायोचीत होणार नाही. त्याप्रमाणे वादीने रक्कम रुपये ३,८६,९१४/- वर द.सा.द.शे. ६% प्रमाणे व्याज आकारुन वसुल करणे रास्त व न्यायोचीत होईल. त्याअनुशंगाने मी वरील मुद्दांचे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) वादीचा दावा खर्चासह अशंतः मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादीला याद्वारे निर्देशीत करण्यात येते की, त्याने रक्कम रुपये ३,०७,८०७/- ( तीन लाख सात हजार आठशे सात फक्त) वर बाजार

शिरस्ते १८% प्रमाणे दि. २७/०७/२०१६ पासुन ते दि. ३१/१२/२०१७ पर्यन्त होणारे व्याज रक्कम रुपये ७९,१०७/- अशी एकुण रक्कम रुपये ३,८६,९१४/- ही वादीस देण्यात यावी.

३) प्रतिवादीला निर्देशीत करण्यात येते की, रक्कम रुपये ३,८६,९१४/- (तीन लाख शहाऐंशी हजार नउशे चवदा फक्त) वर द.सा.द.शे. ६% प्रमाणे व्याजासह दावा दाखल तारखेपासुन ते रक्कम वसुल होईपर्यन्त वादीला देण्यात यावी.

४) येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

स्वा /-

**(** एस**.**डी**.** हरगुडे**)**

मलकापूर २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्त.,

दि. २८/०१/२०१९ मलकापुर.

----------

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मुळ न्यायनिर्णय प्रतिप्रमाणे तंतोतंत शब्दश् बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – के.ए. आडवे.

कोर्टाचे नांव - २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्त.,मलकापूर.

दिनांक- ०१/०२/२०१९